# कला व विज्ञान महाविद्यालय, नाचणगाव-पुलगाव

## आवश्यक मराठी

## बी. ए. भाग

# पद्य विभाग

## १. ज्ञानदेवांचे अभंग

**— संत ज्ञानेश्वर (१२७५—१२९१)**

**पूर्ण नाव — ज्ञानदेव विठ्ठलपंत कुलकर्णी**

ज्ञानेश्वर संत तसेच श्रेष्ठ कवीही होते. आपली प्रतिभा व कवितांचे सामर्थ्य त्यांनी विश्वात्मक देवांच्या आज्ञेने धर्म—कीर्तनासाठी खर्च केले. महाराष्ट्रात भागवत धर्माची (वारकरी) स्थापना करून त्यानिमित्ताने समाजाला नवे वळण देण्याचे मोठे काम त्यांनी केले. भावार्थ दीपिका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, स्फूट अभंग असलेले अभंगांची गाथा ही त्यांची ग्रंथ संपदा त्यांनी मराठीतून लिहिली. याचे कारण ''माझा मराठाची बोलु कौतुके। परि अमृताते पैजा जिंके।।'' असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांना आपल्या कवित्व शक्तीची पूर्ण जाणीव होती. असे दिसून येते. ज्ञानेश्वरी हा अध्यात्मपर ग्रंथ आहे. त्यातील तत्त्वज्ञान सर्वांच्या जीवनाला पोषक ठरणारे आहे. म्हणूनच त्यांनी गीता टीका मराठीतून लिहिली.

हरिपाठाचे अभंग हा वारकऱ्यांमध्ये अतिशय रूजलेला व आवडणारा प्रकार आहे. वारकरी दररोज या हरीपाठाचे गुणगाण करतो. म्हणजेच वारकऱ्यांची ही दैनंदिनीच ठरलेली आहे. पहिल्या अभंगात ज्ञानेश्वरांनी परमेश्वराच्या नामस्मरणाने काय सिद्ध होते. याचे वर्णन करताना म्हटले आहे.

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।।१।।
हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।

मानव जन्मात अनेक गोष्टींमुळे तो व्यस्त झालेला आहे. अशावेळी तो देवाला विसरू नये, किंबहुना एखादा क्षण जरी मिळाला तरी त्याने देवाच्या दारात उभे राहून सगूण भक्तीची उपासना करण्यासाठी सिद्ध झाला पाहिजे आणि चराचराला व्यापून उरलेल्या भगवंताचे दर्शन घेण्यासाठी अपार श्रद्धेच्या द्वारापाशी जो आला त्याला मुक्तीच्या चारही पायऱ्या क्षणात चढून जाता येतात. त्यामुळे पुण्याची अगण्ति ग्वाही ज्ञानेश्वर घेतात. हे करत असताना संसार त्याग करण्यासाठी ज्ञानेश्वर सांगत नाही. उलट संसारात विषयाने त्रस्त झालेल्या जीवाने हरिनामेचे स्मरण जीव्हेने केल्यास संसारातूनच त्याला मुक्ती मिळते. याकरिता चारही शास्त्रे बाहू उभारून उपदेश करीत आहेत. —

असोनी संसारी जिव्हे वेगु करी । देवशाास्त्रे उभारी बाळ्या सदा ।।३।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणे । द्वारकेचे राणे पांडवा घरी ।।४।।

सामान्य जीवाचा उद्धार होऊ शकतो याची ज्ञानेश्वरांना खात्री आहे. ज्याप्रमाणे व्यासांनी पांडवांना आत्मसुखाच्या खुणा दाखवून दिल्या होत्या. तसेच पुराण ग्रंथातून हाच उपदेश दिला होता. एवढेच नव्हे तर

पांडवांनी श्रीकृष्णाचे नामस्मरण केल्याने द्वारकेचा राणा (श्रीकृष्ण) खुद्द पांडवांच्या घरी जात असे. म्हणूनच ज्ञानेश्वर या अभंगातून नामस्मरणाचे महत्त्व सर्वश्रेष्ठ आहे. याची जाणीव करून देतात. नामस्मरण व भक्तीने हा संसारसागर तरून जातो याची त्यांना खात्री आहे.

हरिपाठाच्या बाराव्या अभंगात मनुष्याच्या स्वभावावर ज्ञानदेवांनी प्रकाश टाकलेला आहे. अल्पशा प्रयत्नाने आपल्याला यश प्राप्त व्हावे अशी माणसाची प्रवृत्ती असते. यावर ज्ञानदेव उत्तर देतात. –

तीर्थ व्रत नेम भावेविण सिद्धि । वायाचि उपाधि करिसी जना ।।१।।
भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे । करतळी आंवळे तैसा हरी ।।२।।

केवळ तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये अशा गोष्टींनी सिद्धी प्रप्त होत नसते तर त्यासाठी उच्च कोटीचा भाव मनात असावा लागतो. एवढेच नव्हे तर नित्य श्रद्धाही पाहिजे. अन्यथा संसारिक माणसाला अनेक उपाधी लागून तो त्यातच अडकतो व त्याचे जीवनवाया जाते. या सर्व गोष्टी जीवाला हरिभक्तीच्या बळावर प्राप्त होतात. परंतु काहीवेळा जीवाला याचे आकलन होत नाही जर याचे महत्त्व त्याला कळले मर हातावरच्या आवळ्या जशा जवळ येतात. असा परमेश्वर तुमच्या जवळ येईल. याकरिता त्याला उपासना करावी लागेल.

जीवाच्या आयुष्यात अनेकदा संधी चालून येतात. त्या संधीचे सोने करून घेण्याची मानसिकता त्यांच्या ठिकाणी असली पाहिजे. या संधीचे सोने करून घेण्यासाठी त्याला फार प्रयत्न करावे लागतील पण ही संधी गेल्यावर मात्र काय होईल हे ज्ञानदेव सांगतात. –

पारियाचा रवा घेता भूमीवरी । यत्न परोपरी सााधन तैसे ।।३।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हाती ।।४।।

ज्याप्रमाणे पारा जमिनीवर सांडतो (विखुरतो) त्या सांडलेल्या पाऱ्याला कितीही प्रयत्न केल्यास वेचता येत नाही. त्याप्रमाणे गेलेली वेळ परत येत नाही. हे तत्त्वज्ञान ज्ञानदेव सांगतात. श्री निवृत्तीनाथांसारखे उपाधरहित मला गुरू मिळाले. त्यांनी मला जो मार्ग दाखविला परंतु त्यासाठी गुरू व शिष्य यांच्यात एकरूपता असणे आवश्यक आहे. गुरू स्वत: शिष्याच्या हाती काही अर्पण करतो म्हणूनच जीवाने सुद्धा परोपरीने हरिभक्ती करून सदैव प्रयत्न करावे. असे ज्ञानदेव सांगतात.

अठ्ठाविसाव्या अभंगात ज्ञानदेवांनी ज्या हरिपाठाची रचना केली. त्यामुळे साधकांचा निश्चितपणे उद्धार होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. –

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ।।१।।
नित्य पाठ करी इंद्रायणी तीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ।।२।।

ज्ञानदेव नेवासे ते आळंदी असा प्रवास करीत असत. त्यावेळी इंद्रायणीच्या तीरावर बसून त्यांनी ही रचना केलेली आहे. या अठ्ठाविस अभंगांचे नित्य पठण जो करेल तोच सर्वार्थाने खरा अधिकारी ठरेल. कारण जीवनात सहजरीत्या काहीच शक्य नाही हे त्यांना सांगावयाचे आहे.

कोणतीही गोष्ट साध्या करण्याकरिता मन स्वस्थ व चित्त एकाग्र असावे लागते. अन्यथा ते काम यशस्वी होत नाही. असे ज्ञानदेव सांगतात. –

असावे स्वस्थ चित्त एकाग्री मन । उल्हासें करून स्मरण जीवी ।।३।।
अंतकाळी तैसा संकटाचे वेळी । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ।।४।।

स्वस्थ चित्त, मन एकाग्री करून मन प्रसन्न ठेवून जीवाला स्वरूपाचे स्मरण करून देणे आवश्यक आहे. किंबहुना ज्याचे मन एकाग्र व चित्त स्वस्थ नसेल त्याला मृत्यू समयी अनेक संकटांचा सामना करावा लागतो. याउलट —

संत सज्जनांनी घेतली प्रचीती । आळसी मंदमती केंवि तरे ।।५।।
श्रीगुरू निवृत्ति वचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।

वरील सर्व बाबी केवळ गुरूप्रसादाने व त्याच्या मार्गदर्शनाने शक्य होतात. याची कल्पना ज्ञानदेवांना आहे. श्री निवृत्तीनाथ ज्ञानदेवांचे गुरू होते. निवृत्तीनाथांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून या समाजाकरिता मोठे कार्य करण्यास प्रोत्साहित केले. एवढेच नव्हे तर माता—पित्याचे प्रेमही दिले. नाममात्राची दीक्षाही दिली. त्यामुळे ज्ञानदेवांना जो ब्रम्हानंद लाभला त्याने ज्ञानेश्वर तात्काळ तृप्त झाले.

तेराव्या शतकात असणाऱ्या सामाजिक, धार्मिक व वाङ्मयीन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीशी सामना करणाऱ्या ज्ञानश्वरांची समाजाने अनेकदा प्रतारणा केली. पुरुतु या विस्कटित किंवा वाईट मार्गाने लागलेल्या समाजाचे कल्याण व्हावे या उद्देशाने त्यांनी हरिपाठाच्या अभंगांची रचना केली. ही रचना तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब तर आहेच तर दुसरीकडे वर्तमान काळात सुद्धा याची प्रासंगिकता कमी होत नाही. उलट दिवसेंदिवस ज्ञानेश्वरांच्या विचारांची व त्यांच्या अभंगांची गरज भासत आहे. म्हणूनच ज्ञानदेवांचे हरिपाठाचे अभंग माणसाच्या जीवनात पावलोपावली मार्ग दाखविणारे ठरतात.